**आदिवासी क्षेत्र उपयोजना तयार करण्यासाठी जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समिती गठीत करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**क्रमांक : टीएसपी-१०९९/प्र.क्र.२७/का.६**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १९ जून, १९९९.**

**वाचा :-** १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक टीएसपी-१०७९/पीआरजी १०, दिनांक १५.१०.१९७९.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक टीएसपी-१०८०/का.१९, दिनांक ३०.११.१९८२
३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक आऊयो-१०९०/प्र.क्र.४३/योजना-१२, दिनांक २१.६.१९९०.
४) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक जिनीस-१०९८/प्र.क्र.९३ (भाग-२)/का.१४४४, दिनांक १२.३.१९९९.

**प्रस्तावना :-** संविधानाच्या ७४ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेडडी नुसार शासनाने पूर्वीच्या सर्व जिल्हा नियोजन व विकास समित्या आणि मंडळाच्या अखत्यारितील कार्यकारी समित्या व उप समित्या बरखास्त केल्या आहेत. तद्नंतर जिल्हयातील अनुसूचित क्षेत्र वगळून प्रत्येक जिल्हयात जिल्हा नियोजन समित्या स्थापन केल्या आहेत. या नवनियुक्त जिल्हा नियोजन समित्यांच्या कार्यकक्षेतून अनुसूचित क्षेत्र वगळण्यात आल्याने राज्यात राबविण्यात येत असलेली पंचवार्षिक व वार्षिक आदिवासी उपयोजना शासनाने ठरवून दिलेल्या जिल्हा निधीमर्यादेत व मार्गदर्शक सूचनेप्रमाणे तयार करणे तसेच त्याचा आढावा घेणे यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शासनाने आता राज्यातील पंधरा प्रमुख आदिवासी प्राबल्य असलेले जिल्हे व माडा/ओटीएसपी क्षेत्र असलेल्या इतर जिल्हयात खालील सदस्यांची जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

## जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समिती

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हयाचे प्रभारी मंत्री | -- | अध्यक्ष |
| २) विभागीय आयुक्त | -- | सहअध्यक्ष |
| ३) जिल्हयातील एक लोक नियुक्त आदिवासी प्रतिनीधी (खालील क्रमांक ६,७ व ८ पैकी) | -- | उपाध्यक्ष |
| ४) अपर आयुक्त आदिवासी | -- | उपाध्यक्ष |
| ५) जिल्हयाकरिता असलेल्या संबंधित सांविधिक विकास मंडळाचा एक प्रतिनिधी | -- | सदस्य |
| ६)जिल्हा परिषद अध्यक्ष | -- | सदस्य |
| ७) जिल्हयातील निवडून आलेले आदिवासी लोकसभा सदस्य | -- | सदस्य |
| ८) जिल्हयातील निवडून आलेले आदिवासी विधानसभा/विधानपरिषद सदस्य | -- | सदस्य |
| ९) जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचे अध्यक्ष. | -- | सदस्य |
| १०) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती. | -- | सदस्य |
| ११) जिल्हयातील दोन अशासकीय आदिवासी प्रतिनिधी (शासनामार्फत नियुक्त करावयाचे) | -- | सदस्य |
| १२) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद. | -- | सदस्य |
| १३) जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे अध्यक्ष | -- | सदस्य |
| १४) जिल्हा नियोजन समितीवर नियुक्त करण्यात येणा-या महिला अशासकीय सदस्यांपैकी आदिवासी महिला सदस्य. | -- | सदस्य |
| १५) जिल्हाधिकारी | -- | सदस्य सचिव |

२. जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीकडे खालील कामे सोपविण्यात येत आहेत :-

१) शासनाने ठरवून दिलेल्या जिल्हा निधी मर्यादेत व मार्गदर्शक तत्वाप्रमाणे पंचवार्षिक व वार्षिक जिल्हा आदिवासी उपयोजना तयार करणे.

२) आदिवासी उपयोजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी नियमित आढावा घेणे, आदिवासी

उपयोजनेतील त्रुटी पूर करणे.

३) आदिवासी उपयोजनेंतर्गत मंजूर निधीच्या खर्चावर लक्ष ठेवून ठरविलेली उद्दीष्टे पूर्ण होतील याची दक्षता घेणे व योजनांच्या योग्य अंमलबजावणीसाठी उपाय सूचविणे.

४) आदिवासी उपयोजनेंतर्गत मंजूर निधीबाबत पूनर्विनियोजन, पुनर्वाटपाबाबत व समायोजनाबाबत शासनास शिफारस करणे.

३. जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीने मान्य केलेला जिल्हयाचा वार्षिक नियोजन आराखडा तद्नंतर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, सचिव, आदिवासी विकास विभाग व नियोजन विभाग, मंत्रालय यांना सादर करण्यात यावा.

४. जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीच्या बैठका साधारणता दरमहा आयोजित करण्यात याव्यात. जर या बैठकांना अध्यक्ष वा उपाध्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत तर उपस्थित सदस्यांपैकी एकाने बैठकीला निर्देशित करावे व परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली कामे हाताळावीत.

५. जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीच्या लोक नियुक्त आदिवासी प्रतिनिधी उपाध्यक्षांनी खालील कर्तव्ये हाताळावीत.

१) जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीचे अध्यक्ष उपस्थित नसतील तेव्हा समितीचे अध्यक्ष पद भूषवून अध्यक्षांची कामे हाताळावीत.

२) आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी करणा-या अधिका-यांच्या व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिका-यांच्या बैठका घेवून योजनांचा आढावा घ्यावा व समितीच्या अध्यक्षांना शिफारशी कराव्यात.

३) अध्यक्षांच्या परवानगीने आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्रांचा दौरा करुन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा. या दौ-यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून लागू असलेला प्रवास भत्ता, दैनिक भत्ता इत्यादी भत्ते नियमाप्रमाणे त्यांना देय असतील.

५. जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीचे सदस्य सचिव म्हणून संबंधित जिल्हाधिका-यांनी आदिवासी उपयोजनेंतर्गत सर्व अंमलबजावणी अधिकारी व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका आयोजित कराव्यात व आदिवासी उपयोजनेचा आढावा घ्यावा तसेच, आपला अहवाल शासनास सादर करावा.

६. जिल्हा आदिवासी उपयोजना नियोजन समितीवर नियुक्त करण्यात येणा-या अशासकीय सदस्यांना दैनिक भत्ता/प्रवास भत्ता देण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कुंदा गोसावी )
अवर सचिव.

प्रति,
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्र्यांचे सचिव.
सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक
शासनाचे मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव.
शासनाचे सर्व प्रधान सचिव/सचिव.
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
सर्व जिल्हाधिकारी.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती.
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळे.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
निरनिराळया मंत्रालयीन विभागाचया अधिकारीकेतील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
सर्व मंत्रालयीन विभाग.
आदिवासी विकास विभागातील सर्व अधिकारी.
निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.